देश पारतंत्र्यात असताना जैन आचार्य जवाहरलाल महाराजांकडून लोकांमध्ये पुनर्जागृतीचे कार्य : राज्यपाल आचार्य देवव्रत >> पान 2

प्रशासकीय अधिकाऱ्यांनी नैसर्गिक शेतीला चालना द्यावी : राज्यपाल आचार्य देवव्रत >> पान 3

शेवटच्या घटकाचा विचार हाच खरा न्याय – न्यायमूर्ती अनिल किलोर >> पान 4



दैनिक
# आपला विदर्भ


apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 103 ■ सोमवार, दि. 17 नोव्हेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


**सुविचार**

''जग बदला नाही, स्वत:ला बदला.''




महेश बाबू फोनला हात न लावता ८ तास शूटिंग करतो: राजामौली म्हणाले- प्रत्येकाने हे शिकावे, वाराणसीत हनुमानापासून प्रेरित व्यक्तिरेखा

आतील पान


# माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांचे कार्य राज्याला दिशादर्शक – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक आपला विदर्भ**



**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलेले दिवंगत वसंतराव नाईक यांनी राज्याच्या दुष्काळमुक्तीसाठी केलेली जलसंधारणाची कामे तसेच अन्नधान्यांमध्ये स्वयंपूर्णतेसाठी राबविलेल्या उपक्रमांचा आजही राज्याला मोठा लाभ होत आहे. राज्याला दिशा देणारे आणि परिवर्तनाची प्रेरणा देणारे त्यांचे कार्य खऱ्या अर्थाने दिशादर्शक असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

छत्रपती संभाजीनगर शहरातील सिडको येथे हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते आज झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, खासदार संदिपान भुमरे, खासदार डॉ. कल्याण काळे, खासदार डॉ. भागवत कराड, आमदार संजय केणेकर, आमदार अनुराधा चव्हाण, मनपा आयुक्त जी. श्रीकांत उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा राज्याच्या जडणघडणीमध्ये मोलाचा वाटा आहे. राजकारणात विविध पदावर काम करताना महाराष्ट्र स्वयंपूर्ण करण्याचे देखील काम केले. बंजारा समाजामध्ये मोठ्या प्रमाणात जागृती निर्माण केली. समाजाला शिक्षणाकडे वळविण्यासाठी अनेक शिक्षण संस्थांची निर्मिती केली असून समाजातल्या विविध परंपरा जोपासल्या पाहिजेत यासाठीही त्यांनी प्रयत्न केला, राजकीय सामाजिक जीवनामध्ये नगराध्यक्ष पदापासून आमदार, खासदार, मुख्यमंत्री अशा विविध पदांवर नाईक साहेबांनी काम केले. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये सर्वाधिक काळ राहिलेले मुख्यमंत्री म्हणून दिवंगत नाईक साहेबांच्या नावाची नोंद असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

राज्यातील १९७२ च्या भीषण दुष्काळात राज्याला जलसंधारणातून दुष्काळमुक्त करण्याचा निर्णय दिवंगत वसंतराव नाईक यांनी घेतला.''महाराष्ट्र दुष्काळमुक्त करायचा असेल तर जलसंधारण हाच एकमेव मार्ग आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब साठवा, जमिनीतील पाणी वाढवा, वाहून जाणारी माती रोखा तरच शेतकरी बांधवांना दिलासा मिळेल, असा विचार त्यांनी रूजविला. दिवंगत वसंतराव नाईक साहेबांनी राज्यात व्यापक स्वरूपात जलसंधारणाची कामे सुरू करून जलक्रांतीची पायाभरणी केली. महाराष्ट्र अन्नधान्यांच्या बाबतीत समृद्ध व स्वयंपूर्ण व्हावा, हा त्यांचा स्पष्ट हेतू होता. महाराष्ट्राला स्वयंपूर्ण करून मोठे परिवर्तन घडवून आणले आणि ते पुढील पिढ्यांसाठी दिशादर्शक ठरले. दुष्काळाचा सामना करताना इतिहासाचा मागोवा घेतल्यावर >> पान २

## ऐन निवडणूक काळात बीडमध्ये तलवारी जप्त; पोलिसांची कारवाई

**बीड/प्रतिनिधी :** बीड शहरात नगराध्यक्षपद निवडणुकीचे वातावरण तापलेले असताना एक तरूण रविवारी तलवार घेऊन फिरत असताना निदर्शनास आला. संबंधित तरुणावर तातडीने कारवाई करत त्याला अटक केली असून, त्याच्या घराच्या झडतीत चार मोठ्या तलवारी आढळून आल्याने खळबळ उडाली. बीड शहर पोलिसांनी अजिजपुरा भागातील एका प्रार्थनास्थळाच्या नजीक ही कारवाई केली. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड शहर पोलिसांकडून अवैध शस्त्रधारकांविरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांनी शेरसिंग हिंदू सिंग टाक, (वय ५५, रा. वडवणी) याच्याकडून आणखीही अवैध शस्त्रे मिळण्याची शक्यता आहे, असे सांगितले. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी सर्व पोलिस ठाणे प्रमुखांना निवडणूक काळात अवैध शस्त्रे जप्त करण्याचे आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने बीड शहर पोलिसांनी कारवाई केली आहे.

## सिएनजी गॅस पाईपलाईनमध्ये बिघाड; मुंबईसह नवी मुंबई, ठाण्यातील सीएनजी रिक्षा-टॅक्सी, बस प्रवासावर परिणाम

**मुंबई/प्रतिनिधी :** सीएनजी पाईपलाईनमध्ये बिघाड झाल्याने मुंबई, नवी मुंबई आणि ठाण्यात सीएनजी पुरवठ्यावर परिणाम होणार आहे. गेलच्या मुख्य गॅस पाईपलाईनमध्ये बिघाड झाल्याने त्याचा परिणाम सीएनजी पुरवठ्यावर झाला आहे. त्यामुळे सीएनजीवर धावणाऱ्या रिक्षा, टॅक्सी, बस आणि खासगी वाहनांना या टंचाईचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. असं असलं तरी घरगुती पीएनजी ग्राहकांना मात्र कोणत्याही व्यत्ययाशिवाय गॅस पुरवठा सुरू राहणार असल्याचं महानगर गॅस लिमिटेड कंपनीकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणात महानगर गॅस लिमिटेडकडून गॅसचा पुरवठा केला जातो. मात्र, आरसीएफ कंपाऊंडमधील गेलच्या मुख्य गॅस पाईपलाईनमध्ये बिघाड झाल्याची घटना समोर आली आहे. यामुळे वडाळा येथील शउथ्च्या सिटी गेट स्टेशनला होणारा सीएनजी गॅस पुरवठा प्रभावित झाला आहे. याचा फटका मुंबईत गॅस पुरवठ्यावर झाल्याचं पाहायला मिळतंय.

## गुंड आणि मोका लावलेल्यांच्या हाती ईश्वरपूर देऊ नका; जयंत पाटलांची महायुतीवर टीका

**सांगली/प्रतिनिधी :** गुंड आणि मोका लागलेल्या लोकांच्या हातात शहर देऊ नका, असे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जयंत पाटील यांनी केले. सांगलीच्या उरुण ईश्वरपूर नगरपरिषद निवडणुकीतील प्रचार शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. उरुण ईश्वरपूर नगर परिषदेसाठी महायुतीकडून गुंड, मोका लागलेल्या लोकांना उमेदवारी दिली जात असल्याचा अप्रत्यक्ष आरोप यावेळी जयंत पाटलांनी केला.

# बीएमसीत काँग्रेसचा स्वबळाचा नारा, उद्धव ठाकरेंची पहिली प्रतिक्रिया, ''त्यांच्या पक्षाने...''

**दैनिक आपला विदर्भ**



**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेनेच्या फुटीनंतर आणि विधानसभा निवडणुकीत झालेल्या पडझडीनंतर शिवसेना ठाकरे गटासाठी मुंबई महापालिकेची निवडणूक अतिशय महत्त्वाची आहे. महाविकास आघाडी म्हणून मुंबई महापालिकेची निव.डणूक विरोधक लढवणार असल्याचे म्हटले जात होते. मात्र, काँग्रेसने स्वबळाची घोषणा दिल्याने मुंबई महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडी फुटली असल्याचे समोर आले आहे. या सगळ्या घडामोडीवर शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पहिल्यांदाच प्रतिक्रिया व्यक्त केली. शिवसेना ठाकरे गटाचे आमदार हारुन खान यांनी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेच्या लोगोचे अनावरण उद्धव ठाकरे यांच्या हस्ते मातोश्रीवर झाले. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विविध मुद्यांवर प्रतिक्रिया दिली.

उद्धव ठाकरे यांनी म्हटले की, तेजस्वी यादव यांच्या सभेला मोठी गर्दी होती. मुख्यमंत्री म्हणतात, जो जिता वो सिकंदरष्ठपण त्यामागचं राज काय? असा सवाल करताना तेजस्वींच्या सभेला एआयची गर्दी होती का, असा सवाल त्यांनी केला. ज्यांच्या सभेला गर्दी झाली नाही ते विजयी झाले असल्याचे ठाकरे यांनी म्हटले. बिहारच्या विजयाचे गणित अनाकलनीय आहे. निवडणूक आयोगाने ६५ लाख मतदार काढले, पण त्यातील पुन्हा किती घेतले, याची माहिती नाही. वाढणारे मतदार कुठून येतात, असा सवालही त्यांनी केला. प्रादेशिक पक्षांना संपवायचे आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले होते असेही ठाकरे यांनी म्हटले. मुंबईत आम्ही मतदारयादीबाबत आक्षेप घेतले, त्यावरही काहीही प्रतिसाद मिळाला नसल्याचे उद्धव यांनी सांगितले.

काँग्रेसच्या स्वबळावर

काय म्हणाले उद्धव?

आगामी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत काँग्रेसने स्वबळाचा नारा दिला आहे. या निवडणुकीत काँग्रेसने आघाडी करणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. काँग्रेसने स्वतंत्र लढल्यामुळे त्याचा फटका ठाकरे गटाला बसणार असून भाजपचा फायदा होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. काँग्रेसच्या भूमिकेबाबत विचारले असता, उद्धव ठाकरे म्हणाले की, ते त्यांच्या पक्षाचा निर्णय घेण्यास समर्थ आहेत. तर मी माझ्या पक्षाचा निर्णय घेण्यास समर्थ आहे. काँग्रेसने बीएमसीच्या सर्व २२७ जागा स्वतंत्रपणे लढवण्याची घोषणा केल्यानंतर महाविकास आघाडीत मोठी दरी पडली असून, याचा थेट परिणाम शिवसेना (ठाकरे) गटावर होऊ शकतो, अशी चर्चा आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये उद्धव ठाकरे यांच्याबरोबर उभा राहिलेला मुस्लिम आणि अनुसूचित जात समुदायातील मतदार पुन्हा काँग्रेसकडे वळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## काँग्रेसने आत्मपरीक्षण करणे गरजेचे: जागावाटपात उदारमतवादी भूमिका घ्यायला हवी होती, बिहार निवडणुकीवर पृथ्वीराज चव्हाण स्पष्टच बोलले

**मुंबई/प्रतिनिधी :** बिहार निवडणुकीच्या निकालांवर देशभरात चर्चा सुरू असताना, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी काँग्रेसच्या अंतर्गत गोंधळ, चुकीचे अंदाज आणि अपयशी रणनीतीवर थेट बोट ठेवले आहे. एका वृत्तसंस्थेशी बोलताना चव्हाण यांनी पक्षाला आरसा दाखवणारे वक्तव्य केले असून, त्यांनी काँग्रेसच्या सल्लागारांच्या निर्णयक्षमतेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, मी बिहारला गेलो नाही, पण संपूर्ण राज्यावर भाष्य करणे योग्य ठरणार नाही. तसेच काँग्रेसच्या सल्लागारांनी दिलेले अंदाज वास्तवापासून दूर होते. आपल्याकडे १९ जागा होत्या, त्या २१ किंवा २२ झाल्या असत्या, अगदी १७-१८ झाले



असते तरी ठीक, पण निवडक ३० जागा लढल्या असत्या आणि राजदला ४० जागा देण्याची भूमिका घ्यायला हवी होती. तसेच जागावाटपात उदारमतवादी भूमिका घेतली असती तर जास्त जागा मिळू शकल्या असत्या, असेही चव्हाण यांनी म्हटले. पुढे बोलताना पृथ्वीराज म्हणाले, मी काँग्रेस पक्षाबद्दल काहीतरी >> पान २


# मुंबई लोकलचा प्रवास फुकटात, हे ॲप वापरून रेल्वेलाच चुना, मुंबईत हे काय सुरूये?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईची जीवनवाहिनी म्हणून ओळखली जाणाऱ्या लोकल ट्रेनने दररोज लाखो प्रवाशी प्रवास करतात. पण या प्रवाशांमध्ये विनातिकीट प्रवास करणाऱ्यांची संख्या सातत्याने वाढताना दिसते. आता तर फुकट प्रवासासाठी काही जणांनी अगदी नवीन जुगाड ही शोधून काढला आहे. हा जुगाड नेमका कसा काम करतो आणि त्यामुळे रेल्वे प्रशासन कोणत्या अडचणीत सापडले आहे हे जाणून घ्या. लोकल तिकीट किंवा सीझन पास अधिकृतपणे यूटीएस ॲपमधून सहज मिळू शकतात. पण काही प्रवाशी त्याचा फायदा न घेता खोटे स्क्रीनशॉट, एडिट केलेली तारीख आणि बनावट क्यूआर कोड वापरून रेल्वेची फसवणूक करत आहेत. २०२५ च्या जुलै महिन्यात पश्चिम रेल्वेला असा पहिला बनावट यूटीएस पास सापडला. मात्र त्यानंतर काही महिन्यांतच अशी अनेक प्रकरणे उघड झाली. विशेषत: एसी लोकल सुरू झाल्यापासून हा प्रकार आणखी वाढल्याचे रेल्वे प्रशासनाचे निरीक्षण आहे.

अलीकडेच मंगळवारी विरार एसी लोकलमध्ये एका प्रवाशाला अशीच बनावट तिकीट दाखवताना पकडले. नायगाव स्थानकात सायंकाळी तपासणी सुरू असताना त्या व्यक्तीने यूटीएस ॲपवरचे तिकीट दाखवले. पहिल्यांदा ते खरे वाटले, पण क्यूआर कोड स्कॅन करताच त्रुटी दिसून आल्या. तपासणी ॲपमध्ये ते तिकीट मुळातच अस्तित्वात नसल्याचे स्पष्ट झाले. त्या प्रवाशाने जुन्या तिकीटाचा स्क्रीनशॉट घेऊन त्यावर तारीख बदलून नवे तिकीट असल्याचा भास निर्माण केला होता. त्याच्यावर त्वरित गुन्हा दाखल करण्यात आला आणि वसई पोलिसांकडे तक्रार देण्यात आली. याशिवाय दंड देखील आकारण्यात आला.

रेल्वे अधिका?यांच्या म्हणण्यानुसार, मागील दोन वर्षात विशेषत: पश्चिम रेल्वे विभागात यूटीएस ॲपचा गैरवापर करणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढली आहे. एसी लोकलमध्ये असे प्रकार सर्वाधिक आढळत आहेत. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने तिकीट तपासणी आणखी कडक करण्याचे आदेश दिले आहेत. क्यूआर कोडची तपासणी, सीझन पासची बारकाईने चाचणी आणि संशयित तिकिटांवर तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. रेल्वेने प्रवाशांना अधिकृतपणेच तिकीट खरेदी करण्याचे आवाहन केले असून फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणार असल्याचे स्पष्ट केले आहे.





# पंतप्रधान आणि राष्ट्रपती बनण्याची इच्छा का नाही?

## नितीन गडकरींनी पहिल्यांदाच जाहीर कार्यक्रमात स्पष्टच सांगितले

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे पंतप्रधान पदाच्या स्पर्धेत असल्याची चर्चा कायमच राजकीय वर्तुळात रंगत असते. मात्र, खुद्द गडकरींनी एका कार्यक्रमात यावर स्पष्टीकरण दिले आहे. गडकरींनी भाषणातून अनेकदा आपल्याच सरकारवर टीकाही केली. सत्य मांडण्यासाठी कुणालाही न घाबरणारे अशीही त्यांची ओळख आहे. नागपूरच्या आयआयएममध्ये झालेल्या एका कार्यक्रमात नितीन गडकरींनी एक महत्त्वपूर्ण वक्तव्य केले आहे.

गडकरी आपल्या भाषणात म्हणाले की, काम करण्याचा आणि ज्ञानाचा काहीही संबंध नाही. मी विधि महाविद्यालयात शिक्षण घेत असताना ज्यांना खूप चांगले गुण मिळाले त्यांच वकीली व्यवसाय आज चालत नाही. तर जे शेवटच्या बाकावर बसायचे ते मोठे वकील आहेत. त्यामुळे खूप अभ्यास करून गुणवत्ता यादीत आल्याने सर्वकाही होईल असे नाही. कमी गुण मिळाले तरी चालेला मात्र, प्रात्यक्षिक ज्ञान किती मिळेल यावर लक्ष देणे आवश्यक असल्याचेही गडकरी म्हणाले. नागपूर आयआयएममध्ये कार्यक्रम असल्याने गडकरींनी यावेळी शासकीय यंत्रणेवही टीका केली.

आयआयएम नागपूरची इमारत बांधण्यासाठी नियम डावलून खासगी कंत्राटदाराला काम दिले. दर्जेदार डिजाइन तयार करणाऱ्यांची एक स्पर्धा घेतली. त्यानंतर एकाची निवड करून काम दिले. त्यामुळे आज आयआयएमची सुंदर अशी इमारत उभी आहे. मात्र आयआयएमच्या बाजूला असलेल्या एम्समध्ये सरकारी अधिकाऱ्यांनी त्यांच्या कामाचा पूर्ण प्रभाव सोडला आहे. मी हे म्हणू शकतो कारण मी सरकारमध्ये आहे. मी गध्याला घोडा कसा म्हणू, असा प्रश्नही गडकरींनी केला. त्यातील मोठ्या कंत्राटदाराने खूप बेकार कामे केली. त्याने माझ्याकडून खूप शिव्या खालल्या. त्याला सांगितले की, दरवाजा बंद करून खूप ठोकेन, आयुष्यभर लक्षात राहील, अशा शब्दात बजावल्याचे गडकरी म्हणाले.

यावेळी गडकरींनी नागपूर महापालिकेमध्ये कंत्राटदार आणि काही अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या विविध कामांवर नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की, मी देवाला असे मागणे मागेल की मला, पंतप्रधान आणि राष्ट्रपतीही बनवू नको. मात्र, महापालिकेमध्ये अधिकारी बनवून फटके मारणारा बनव. म्हणजे काम न करणाऱ्यांना मला फटके मारता येतील असेही गडकरी म्हणाले.



यावेळी गडकरींनी मिहान उभारण्यासाठी कसे प्रयत्न केले हे सांगितले. प्रत्येक गोष्टीमध्ये काम करण्याची इच्छाशक्ती खूप आपश्यक आहे. कुणीही कामाची जबाबदारी घ्यायला तयार नसतात. ज काम हातात घेतले त्यासाठी प्रचंड मेहनत घेण्याची गरज आहे. नागपूरमध्ये रोजगाराची कमतरता नाही. खूप मोठ्या प्रमाणात कंपन्या आल्याने रोजगार उपलब्ध झाला आहे असेही ते म्हणाले. आयुष्यात सर्वात अधिक महत्त्व आरोग्याला द्या. प्रत्येकाच्या उणिवा आणि जमेच बाजू असतात. मात्र, त्यावर मात करूनही आरोग्य जपा. स्वप्न दाखवणारे नेते लोकांना आवडतात. परंतु, स्वप्न दाखवून ते पूर्ण करणाऱ्या नेत्यांवर लोक प्रेम करतात, असेही गडकरींनी सांगितले.

## मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करणारे बाळासाहेब!

आज १७ नोव्हेंबर, आजच्याच दिवशी म्हणजे १७ नोव्हेंबर २०१२ रोजी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे मराठी माणसांना पोरके करून कायमचे निघून गेले. आज त्यांची १३ वी पुण्यतिथी. बाळासाहेबांचा जन्म २३ जानेवारी १९२६ रोजी झाला. बाळासाहेबांना समाजकार्याचे बाळकडू आपल्या वडिलांकडून म्हणजे प्रबोधनकारांकडून लहानवयातच मिळाले. प्रबोधनकारांच्या प्रबोधनाचा, पुरोगामी विचारांचा व आक्रमक वृत्तीचा वारसा बाळासाहेबांमध्येही कळत नकळतपणे उतरला. सर्वप्रथम एक कलाकार, एक व्यंगचित्रकार म्हणून त्यांनी सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यास सुरुवात केली. १९५० साली ते फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले. फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून काम करत असतानाच बाळासाहेब विविध संस्थांसाठी, कंपन्यांसाठी व नियतकालिकांसाठी व्यंगचित्रकार तसेच जाहिरात डिझाईनचे कामही करत. याच काळात त्यांची आर. के. लक्ष्मण या विख्यात व्यंगचित्रकाराशी ओळख झाली. लवकरच या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. ही मैत्री शेवट पर्यंत टिकून राहिली. आर. के. लक्ष्मण आणि बाळासाहेब ठाकरे या दोघांनी व्यंगचित्रकलेला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. आज व्यंगचित्रकार म्हटले की याच दोघांची नावे समोर येतात. फ्री प्रेस जर्नलमध्ये काही काळ काम केल्यानंतर बाळासाहेबांनी स्वतःचे साप्ताहिक काढण्याचे ठरवले. बाळासाहेब स्वतः व्यंगचित्रकार होते त्यामुळे हे साप्ताहिक व्यंगचित्रात्मकच होते हे वेगळे सांगायला नको. ऑगस्ट १९६७ साली बाळासाहेबांनी मार्मिक हे साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकाला मार्मिक हे नाव प्रबोधनकारांनी सुचवले. ऑगस्ट १९६७ मध्ये महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते मार्मिकच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन झाले. महाराष्ट्राच्या उद्धारासाठी आणि मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी सुरू करण्यात आलेले मार्मिक आजही तितक्याच जोमात सुरू आहे. बाळासाहेबांनी ज्या उद्देशाने हे साप्ताहिक सुरू केले होते तो उद्देश सफल झाला असेच म्हणावे लागेल. मराठी माणसांच्या मुंबईतच मराठी माणसांवर होणाऱ्या अन्यायाला मार्मिकने वाचा फोडली. महाराष्ट्रातच मराठी माणसांची गळचेपी होऊ लागली. मराठीवर अन्याय होऊ लागला हा अन्याय केवळ व्यंगचित्रांच्या फटकाऱ्याने दूर होणार नाही त्यासाठी आणखी संघटित प्रयत्न करायला हवेत असा विचार बाळासाहेबांच्या मनात आला. बाळासाहेबांनी मराठी मणसांना एक करून मोठे संघटन उभारले. या संघटनेला कोणते नाव द्यायचे असे बाळासाहेबांनी प्रबोधनकारांना विचारले. प्रबोधनकारांनी क्षणाचाही विलंब न करता नाव घेतले शिवसेना यानंतर बाळासाहेबांनी १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची अधिकृत स्थापना केली. ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हे ब्रीद घेऊन स्थापन झालेल्या शिवसेनेत तरुणांचा भरणा सुरू झाला. गाव तिथे शाखा असा प्रवास करत अल्पावधीतच शिवसेना महाराष्ट्रभर पसरली. गावागावात, खेड्यापाड्यात शिवसेनेच्या शाखा स्थापन झाल्या. शिवसेनेचा पहिला मेळावा ३० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवतीर्थ मैदानावर संपन्न झाला. या मेळाव्यापासूम शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवतीर्थावरील ( शिवाजीपार्क ) मराठी माणसांची प्रचंड गर्दी असे समिकरणच तयार झाले. शिवतीर्थावर बाळासाहेबांचे भाषण ऐकण्यासाठी राज्यभरातून लोक येत. त्यांच्या वक्तृत्वाने उपस्थित जनसमुदाय भारावून जात. वक्तृत्वाबरोबरच भेदक लेखणी हे देखील बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे महत्वाचे वैशिष्ट्ये. बाळासाहेबांनी सामना सुरू केल्यावर या लेखणीची ताकद देशाला समजली. सामना मधील बाळासाहेबांच्या अग्रलेखांची वाट पूर्ण महाराष्ट्र पाहत असे. १९९५ साली बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रभर झंझावती प्रचार केला. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी प्रचारसभा घेतल्या. त्यांच्या सभेला लाखोंची गर्दी होऊ लागली. आपल्या आक्रमक भाषणांनी सत्ताधारी पक्षाला त्यांनी सळो की पळो करून सोडले. बाळासाहेबांमुळेच शिवसेना भाजप युतीचे सरकार महाराष्ट्रात स्थापन झाले. मनोहर जोशी मुख्यमंत्री बनले. या सरकारने एक रुपयात झुणका भाकर, वृद्धाश्रमांची साखळी, वृद्धांना सवलती, झोपडपट्टी वासीयांना घरे, मुंबई – पुणे हायवे, मुंबईतील उड्डाणपूल, बॉम्बे चे मुंबई नामांतर असे अनेक लोकहिताचे निर्णय घेतले. या सर्व योजना प्रकल्पांची मूळ संकल्पना बाळासाहेबांचीच होती. आज मुंबई महाराष्ट्रात आहे याचे सर्व श्रेय बाळासाहेबांना जाते. बासाहेबांमुळेच मुंबई महाराष्ट्रात आणि मराठी माणूस मुंबईत दिमाखात राहू शकतो. बाळासाहेब नसते तर मुंबई परप्रांतीयांच्या घशात आणि मराठी माणूस मुंबईच्या बाहेर गेला असता. बाळासाहेबांनीच मराठी माणसाला स्वाभिमानाने जगायला शिकवले. बाळासाहेबांमुळेच मराठी माणूस आज ताठ मानेने जगत आहे. मराठी माणसांसाठी त्यांनी जे केले ते इतर कोणत्याही नेत्याला करता आले नाही म्हणूनच मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. आज त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाराष्ट्रातील तमाम मराठी माणूस त्यांना अभिवादन करत आहे. मराठी माणसांच्या मनात स्वाभिमान जागृत करणाऱ्या बाळासाहेबांना विनम्र अभिवादन!

# देश पारतंत्र्यात असताना जैन आचार्य जवाहरलाल महाराजांकडून लोकांमध्ये पुनर्जागृतीचे कार्य : राज्यपाल आचार्य देवव्रत

## आचार्य जवाहर लाल स्मृती मुद्रा व टपाल तिकिटाचे प्रकाशन

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : जैन संत व स्वातंत्र्य सेनानी आचार्य जवाहर लाल महाराज यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात लोकांमध्ये धर्म पुनर्जागृतीचे कार्य करीत असताना स्वातंत्र्य लढ्यात मोठे योगदान दिले. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मुद्रा तसेच टपाल तिकीट काढून त्यांच्या कार्याची माहिती भावी पिढ्यांना देण्याचे कार्य स्तुत्य आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज येथे केले.

राज्यपाल श्री. देवव्रत तसेच पंजाबचे राज्यपाल गुलाबचंद कटारिया यांच्या प्रमुख उपस्थितीत आचार्य जवाहर लाल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त त्यांच्यावरील टपाल तिकिट व मुद्रेचे (नाण्याचे) प्रकाशन रविवारी (दि. १६) राजभवन मुंबई येथे करण्यात आले, त्यावेळी राज्यपाल आचार्य देवव्रत



बोलत होते. कार्यक्रमाचे आयोजन जसकरण बोथरा फाऊंडेशनतर्फे करण्यात आले.

भगवान महावीर तसेच विविध जैन संतांनी त्याग, तपस्या व परोपकाराच्या माध्यमातून समाजासाठी प्रेरणादायक काम केले. त्यांनी सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह हे सिद्धांत मानवतेला दिले. जो काळाच्या कसोटीवर टिकतो तो सच्चा धर्म व जो टिकत नाही तो अधर्म असतो असे राज्यपालांनी सांगितले.

आचार्य जवाहर लाल यांनी देश पारतंत्र्यात असताना दहा हजाराहून अधिक सत्संगाच्या माध्यमातून जनजागरणाचे कार्य केले. त्यांनी लोकांना स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्रेरित केले. आचार्य जवाहर लाल यांनी अनेकांत वाद व अपरिग्रह ही तत्वे आयुष्यभर पाळली असे पंजाबचे राज्यपाल गुलाबचंद कटारिया यावेळी म्हणाले.

आचार्य जवाहर लाल महाराज यांनी बालविवाह, हुंडा प्रथा, व्यसनाधीनता यांना तीव्र विरोध केला याचे स्मरण देताना त्यांच्यावरील नाणे व टपाल तिकीट लोकांना त्यांच्या कार्याचे चिरंतन स्मरण देतील, असे श्री. कटारिया यांनी सांगितले.

यावेळी जसकरण फाउंडेशनचे विश्वस्त सिद्धांत बोथरा यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाला राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, राज्यपालांचे सचिव डॉ प्रशांत नारनवरे, पोस्ट मास्टर जनरल अमिताभ सिंह, जसकरण बोथरा फाउंडेशनचे विश्वस्त सिद्धार्थ बोथरा व इतर मान्यवर उपस्थित होते.

पान १ वरून...

## माजी मुख्यमंत्री दिवगंत वसंतराव नाईक

हे प्रकर्षाने जाणवले की, दुष्काळाशी लढण्याचा खरा मार्ग म्हणजे नाईक साहेबांनी दाखविलेला जलसंधारणाचा मार्ग. त्याच प्रेरणेने पुढे जलयुक्त शिवार ही राज्यव्यापी योजना तयार करण्यात आली. या योजनेद्वारे महाराष्ट्रभर जलसंधारणाची मोठ्या प्रमाणावर कामे झाली. योजना तयार करत असताना अनेक व्यक्ती प्रेरणास्थान म्हणून आमच्यासमोर होत्या; परंतू या संपूर्ण उपक्रमामागील मूळ प्रेरणास्थान म्हणजे वसंतराव नाईक साहेबच, हे आपण त्या काळातही स्पष्टपणे नमूद केल्याचा उल्लेखही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केला.

दिवंगत वसंतराव नाईक साहेबांनी राज्यात कृषी व जलसंधारणाबरोबरच बंजारा समाजासाठीही मोठ्या प्रमाणात जागृती व विकासाची चळवळ उभी केली. तांड्यावर राहणारा, परंपरेने श्रमप्रधान पण विकासापासून दूर राहिलेला हा समाज एकेकाळी मार्गनिर्मिती, बावड्या बांधकामे आणि पायाभूत कामांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारा, समृद्ध इतिहास असलेला समाज आहे. पोहरादेवी येथे सेवालाल महाराजांनी बंजारा समाजासाठी निर्माण केलेली 'काशी' अधिक भव्य, आधुनिक आणि जागतिक स्तरावर ओळख निर्माण करणारी व्हावी, यासाठी सरकारने ७०० कोटी रुपयांचा समग्र विकास आराखडा राबविला. त्यामुळे पोहरादेवीचा संपूर्ण कायापालट झाला असून आज ते राज्यातील महत्त्वाचे सांस्कृतिक व आध्यात्मिक केंद्र बनले आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी प्रथमच बंजारा काशी पोहरादेवीला भेट देत म्युझियमचे उद्घाटन केले. याशिवाय म्युझियममध्ये प्रवेश करताना पहिला पुतळा दिवंगत वसंतराव नाईक साहेबांचा स्थापित करण्यात आला आहे. समाजउन्नती, जागृती आणि परिवर्तनाची ज्योत प्रज्वलित करणाऱ्या नाईक साहेबांच्या कार्याचा हा सन्मान असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. पालकमंत्री संजय शिरसाट म्हणाले, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकडून आज दिवंगत वसंतराव नाईक यांचा पुर्णाकृती पुतळयाचे अनावरण होत आहे, हा दिवस खऱ्या अर्थाने बंजारा समाजासह आपल्या सर्वासाठी दिवाळीप्रमाणेच आहे. महानगर वेगाने वाढत असून महानगर सुंदर झाले पाहिजे, कुंभमेळ्यासाठी येणारे भाविक छत्रपती संभाजीनगर येथे येतील, त्यादृष्टीने शहराच्या रस्ते तसेच सर्वांगिण विकासासाठी निधीची तरतूद गरजेची असल्याचे ते म्हणाले. दिवंगत वसंतराव नाईक यांचा पुतळा आपल्या सर्वांना प्रेरणा देईल, असेही ते म्हणाले. महानगरपालिका आयुक्त जी. श्रीकांत यांनी प्रास्ताविक केले. यावेळी नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

### काँग्रेसने आत्मपरीक्षण करणे गरजेचे:

सांगू शकतो, तेही, जे मी थोडे पाहिले आहे. आपण काँग्रेस पक्षाचे आत्मपरीक्षण करत आहोत. जेव्हा जेव्हा विचारांची लढाई असते तेव्हा ती एक-दोन दिवसात संपत नाही. महात्मा गांधींना त्यांचे विचार पोहोचवण्यासाठी, आंबेडकरांना त्यांचे विचार पोहोचवण्यासाठी किती वेळ लागला हे तुम्हाला माहिती आहे. तो काळ देशाच्या इतिहासात एक महत्त्वाचा टप्पा होता. विचारांची लढाई खूप वेदनादायक आहे. चढ-उतार असतात. याचे मूल्यांकन करताना, मला कदाचित एकच गोष्ट वाटेल, दूरवरून, काँग्रेस पक्षाचे सल्लागार जे मतांचे आरक्षण करत होते, त्यांनी कदाचित योग्य आकडे दिले नसतील. आपण निवडक ३० जागा घेत उर्वरित ४० जागा राजदला दिल्या असत्या तर एक चांगला संदेश गेला असता आणि कदाचित जागांची संख्या काहींनी वाढली असती. आपण स्वतःचे परीक्षण केले पाहिजे, काँग्रेस काय करत आहे याचे आत्मपरीक्षण केले पाहिजे, असेही पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटले आहे.

## पालघर साधू हत्याकांडात भाजपने ज्यांच्यावर आरोप केले त्याच काशिनाथ चौधरींच्या हाती कमळ!

**दैनिक आपला विदर्भ**

**पालघर/प्रतिनिधी** : पालघर जिल्ह्यातील गडचिंचले साधू हत्याकांड प्रकरणात भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी मुख्य आरोपी म्हणून काशिनाथ चौधरी यांच्यावर आरोपांची राळ उडवली होती. त्याच काशिनाथ चौधरी यांनी रविवारी नगर पालिका निवडणुकीच्या तोंडावर भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांच्या प्रवेशानंतर भाजपने केलेल्या आरोपांचे काय झाले? असा प्रश्न जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते विचारीत आहेत.राष्ट्रवादी शरद पवार गटाचे स्थानिक नेते काशिनाथ चौधरी यांच्यावर भारतीय जनता पक्षाने गडचिंचले साधू हत्याकांड प्रकरणात जोरदार आरोप केले. काशिनाथ चौधरी हेच साधू हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी असल्याचे सांगून राज्यात रान उठवले. तसेच साधू हत्याकांड प्रकरणावरून संधी मिळताच तत्कालिन ठाकरे सरकारवर अनेक गंभीर आरोप केले. साधू हत्याकांड सहन झाले नाही म्हणूनच उठाव केला असे सांगायला देखील एकनाथ शिंदे यांनी मागे पुढे पाहिले नाही. आता ज्यांच्यावर आरोप केले तेच काशिनाथ चौधरी भाजपमध्ये आल्याने त्या आरोपांचे काय झाले? असे विरोधक विचारीत आहेत.

पालघर जिल्ह्यात जोरदार शक्ती प्रदर्शन करत चौधरी यांनी भाजपमध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला. खासदार हेमंत सावरा आणि भाजप जिल्हाध्यक्ष भरत रजपूत यांच्या उपस्थितीत डहाणू येथे चौधरी यांनी शक्तिप्रदर्शन करत कमळ हाती घेतले. काशिनाथ चौधरी यांच्यासोबत ३ हजारांहून अधिक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये पक्षप्रवेश केला .

# एआयच्या युगातील वाढत्या चुकीच्या माहितीच्या पार्श्वभूमीवर प्रसारमाध्यमांची विश्वासार्हता जपणे ही आपली सामूहिक जबाबदारी

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** :लोकशाही देशातील नागरिकांसाठी प्रसारमाध्यमे ही डोळे आणि कान असतात. राष्ट्रीय पत्रकार दिवस साजरा करत असताना, कृत्रिम बुद्धीमत्तेच्या( एआय) युगातील वाढत्या चुकीच्या माहितीच्या पार्श्वभूमीवर प्रसारमाध्यमांची विश्वासार्हता जपणे हे नागरिकांना सशक्त करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. नवी दिल्लीतील नॅशनल मीडिया सेंटरमध्ये आज आयोजित कार्यक्रमात सहभागी प्रतिनिधींनी ही भावना व्यक्त केली. वाढत्या चुकीच्या माहितीच्या पार्श्वभूमीवर प्रसारमाध्यमांची विश्वासार्हता सुरक्षित ठेवणे या यंदाच्या विषयाची भूमिका मांडताना पीसीआयच्या अध्यक्षा न्यायमूर्ती (निवृत्त) रंजना प्रकाश देसाई म्हणाल्या, ''एआय कधीही मानवी मेंदूची जागा घेऊ शकत नाही.'' निर्णयक्षमता, सद्सद्विवेकबुद्धी आणि जबाबदारीची भावना, जी प्रत्येक पत्रकाराला मार्गदर्शित करते, तिनेच चुकीची माहिती पसरण्यापासून रोखले पाहिजे.

आपल्या मुख्य भाषणात पीटीआयचे मुख्य कार्यकारी अधिकारी विजय जोशी यांनी आज समाजाला भेडसावत असलेल्या माहितीच्या महामारीला तोंड देण्यासाठी उपाय सुचवला. ते म्हणाले, ''पारंपरिक माध्यमांमध्ये वेगापेक्षा अचूकतेला प्राधान्य द्या आणि डिजिटल माध्यमांतील एआय आधारित गणितीय पद्धतीपेक्षा विश्वसनीयतेला स्थान द्या.'' कार्यक्रमाला केंद्रीय माहिती व प्रसारण, रेल्वे आणि इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव उपस्थित होते. तसेच माहिती व प्रसारण राज्यमंत्री आणि संसदीय कार्य राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन, माहिती व प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू आणि पत्रकार परिषद सचिव शुभा गुप्ता यांचीही उपस्थिती होती.

पीसीआयकडून जबाबदार पत्रकारितेचे आवाहन

न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई यांनी पत्रकारितेच्या स्वातंत्र्याचे संरक्षण आणि उच्च दर्जाच्या पत्रकारितेचे पालन ही पीसीआयची दुहेरी जबाबदारी असल्याचे अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, विशेषत: आजच्या काळात, जेव्हा चुकीची माहिती आणि तंत्रज्ञानाचा गैरवापर वाढत आहे, तेव्हा पत्रकारितेमध्ये प्रामाणिकपणा, अचूकता आणि योग्य माहिती देण्याची बांधिलकी अत्यावश्यक आहे.

प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाने (पीसीआयने) समित्या आणि तथ्य शोध पथके तयार केली असल्याचं त्यांनी नमूद केले तसेच पत्रकारांना जबाबदार वर्तणुकीची आणि आणि प्रत्येक वस्तुस्थितीची पडताळणी करण्याचे स्मरण करून दिले. त्यांनी, कल्याणकारी योजना आणि विमा यांद्वारे पत्रकारांच्या आर्थिक सुरक्षेचे महत्त्वही अधोरेखित केले आणि पीसीआयच्या अंतर्वासिता कार्यक्रमामुळे तरुण पत्रकारांना नैतिक कार्यपद्धती शिकण्यास मदत होईल असेही सांगितले. कृत्रिम बुद्धिमत्ता उपयुक्त ठरू शकते मात्र पीसीआय, त्याचा दुरूपयोग रोखण्यासाठी सतर्क असते. साधने कितीही प्रगत झाली तरीही, मानवी मन- निर्णयक्षमता आणि विवेक यांची जागा ते कधीच घेऊ शकत नाहीत, यावर त्यांनी भर दिला.

एआयच्या जगात विश्वासार्हता टिकवून ठेवणे



प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विजय जोशी म्हणाले की, माध्यमांनी, लोकशाहीचे नैतिक रक्षक म्हणून भक्कम नैतिकता बाळगली पाहिजे. पैसे देऊन बातम्या छापणे, जाहिरात आणि पीत पत्रकारिता यांमुळे सार्वजनिक विश्वासार्हतेला धक्का पोहोचल्याचा इशारा त्यांनी दिला. पत्रकारांनी देखील सत्यता पडताळून पाहण्याची सामाईक जबाबदारी पेलली पाहिजे, असे त्यांनी अधोरेखित केले. पीटीआयच्या स्थापनेपासून जपलेली सत्य, अचूकता, निष्पक्षता आणि स्वातंर्त्य यांची परंपरा, ९९ वर्तमानपत्रांनी अधोरेखित केली असल्याचे ते म्हणाले. गतीपेक्षा अचूकता नेहमीच आघाडीवर असली पाहिजे आणि कोणत्याही विशिष्ट हेतूंपासून बातम्या मुक्त असल्या पाहिजेत, यावर त्यांनी भर दिला. तथ्य पडताळणी -फॅक्ट चेक सारख्या पुढाकारांमुळे, बहुस्तरीय पडताळणीमुळे चुकीच्या माहितीच्या पुराचा सामना करण्यास मदत होते. विश्वासार्हता टिकवून ठेवण्यासाठी भविष्यातील पत्रकारांना नैतिकता आणि चिकित्सक विचारसरणीचे प्रशिक्षण देणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. माध्यम स्वातंत्र म्हणजे माहितीची परिसंस्था प्रदुषित करण्याचा परवाना नाही आणि पत्रकारिता ही विश्वासावर आधारित सार्वजनिक सेवा असल्याची आठवण जोशी यांनी करून दिली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## हडपसर हैद्राबाद रेल्वे एक्सप्रेस आणि ट्रॅक्टरचा अपघात, ट्रॅक्टरचा चक्काचूर, बार्शी तालुक्यात घडली घटना

**सोलापुर/प्रतिनिधी :** सोलापुरातील बार्शी तालुक्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. बार्शी तालुक्यात हडपसर-हैद्राबाद रेल्वे एक्सप्रेस आणि ट्रॅक्टरचा अपघात झाला आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार अपघात कोणत्याही प्रकारची जीवीतहानी झालेली नाही. मात्र, ट्रॅक्टरचे मोठे नुकसान झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार हा अपघात किरकोळ असून यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती रेल्वे प्रशासनानं दिली आहे. बार्शी तालुक्यातील खांडवी शेंद्री स्टेशनच्या परिसरात हा अपघात झाल्याची माहिती आहे. रस्त्यावर असलेला फाटक न लावला गेल्यामुळे हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. या अपघातात ट्रॅक्टरचे मात्र मोठे नुकसान झाले आहे.

दरम्यान, गेल्या काही दिवसापासून अनेक ठिकाणी अशा अपघाताच्या घटना घडल्याचे समोर आले आहे. गेल्या १० दिवसापूर्वीच उत्तर प्रदेशातील मिर्जापूर जिल्ह्यातील चुनार रेल्वे स्टेशनवर मोठा रेल्वे अपघात झाला होता. कालका मेल च्या धडकेत सहा भाविकांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली होती. रेल्वे पटली क्रॉस करताना या भाविकांचा अपघात झाला होता. ही घटना इतकी भीषण होती की मृतदेहांच्या चिंधड्या उडल्याचे दिसून आले होते. सर्व प्रवासी कार्तिक पौर्णिमेसाठी गंगा स्नान करण्यासाठी आले होते. या दुर्घटनेनंतर स्टेशनवर काही काळ गोंधळ माजला होता. रेल्वे पोलिस आणि रेल्वे सुरक्षा बल यांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचून मृतदेह हटवले होते. या घटनेने स्थानिक नागरिकांमध्ये आणि प्रवाशांमध्ये प्रचंड संताप पसरला असून, अनेकांनी रेल्वे प्रशासनावर बेजबाबदारपणाचा आरोप केला होता. सकाळी सव्वा नऊच्या सुमारास गोमो-प्रयागराज एक्सप्रेस येथून उतरलेले प्रवासी चुकीच्या दिशेने रेल्वे लाईन पार करत होते. त्याचवेळी प्लॅटफॉर्म क्रमांक तीनवरून हावडा-कालका मेल वेगाने जात होती आणि या ट्रेनच्या धडकेत सहा भाविक जागीच ठार झाले. हा अपघात इतका भीषण होता की मृतदेहांचे तुकडे ओळखणे अवघड झाले होते. जीआरपी आणि आरपीएफ जवानांनी काळजीपूर्वक शव गोळा करून पोस्टमॉर्टेमसाठी पाठवले. या प्रकरणाची आता चौकशी सुरू आहे.

## महिलेच्या गर्भातून गायब झाले बाळ, शोधताना टॉयलेटच्या कमोडमध्ये...

अंबिकापूर : बाळ होणे ही आईसाठी आयुष्यातील सर्वात सुखकर घटना असते. कारण बाळाची नाळ तिच्याशी जोडलेली असते. तिने बाळाला ९ महिने पोटात वाढवलेले असते. अशावेळी तिच्या नकळत बाळाची प्रसूती झाली असेल तर? असाच एक धक्कादायक प्रकार समोर आलाय. छत्तीसगडच्या अंबिकापूर मेडिकल कॉलेज रुग्णालयातून एक धक्कादायक प्रकार समोर आलाय. सूरजपूर जिल्ह्यातील प्रतापपूरची ३० वर्षीय रमापतीबाई सात महिन्यांची गर्भवती होती. १३ नोव्हेंबरला तिला प्रसूतिवेदना सुरू झाल्या. यानंतर तिला प्रथम स्थानिक रुग्णालयात नेण्यात आले. पण प्रकृती गंभीर असल्याने तिला तात्काळ एमसीएचला हलवण्यात आले. उपचार सुरू असताना शनिवारी सकाळी ती वॉर्डातील शौचालयात गेली आणि तिथेच अचानक बाळाचा जन्म झाला. बाळ कमोडमध्ये अडकले, ज्यामुळे रुग्णालयात खळबळ उडाली. शौचालयातून परतल्यानंतर रमापतीबाईला पोटात बाळाची हालचाल जाणवली नाही. घाबरून तिने परिचारिकांना सांगितले. तपासणीत डॉक्टरांना कळले की प्रसूती झालीय आणि पोट रिकामे आहे. याबद्दल डॉक्टरांनी महिलेला विचारले असता मी काही वेळापूर्वी शौचास गेली होती, असे तिने सांगितले. यानंतर परिचारिकांनी ताबडतोब शौचालय तपासले. तेव्हा कमोडमध्ये त्यांना नवजात बाळ अडकलेले आढळले.

# प्रशासकीय अधिकाऱ्यांनी नैसर्गिक शेतीला चालना द्यावी : राज्यपाल आचार्य देवव्रत

दैनिक आपला विदर्भ





**मुंबई/प्रतिनिधी :** रासायनिक खताच्या अतिवापरामुळे जमिनीची उत्पादक क्षमता बाधित होत असून त्यासोबतच कॅन्सर, मधुमेह, उच्च रक्तदाब अशा विविध आजारांचे प्रमाण अनेक पटींनी वाढत आहे. हे सर्व रोखण्यासाठी नैसर्गिक शेतीलाच प्रथम प्राधान्य देणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रशासकीय अधिकारी व प्रबुद्ध समाजाने आपल्या स्तरावर नैसर्गिक शेतीचे महत्त्व शेतकऱ्यांना पटवून द्यावे, असे आवाहन महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज येथे केले.

'संकल्प फाउंडेशन' या प्रशासकीय अधिकारी घडवणाऱ्या सेवाभावी संस्थेतर्फे प्रशासकीय अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित लोकांसाठी 'नैसर्गिक कृषी : अनुपम भारतीय वारसा' या विषयावर राजभवन मुंबई येथे आयोजित चर्चासत्रामध्ये संवाद साधताना राज्यपाल बोलत होते.

मोठ्या प्रमाणात होत असलेली रासायनिक खतांची आवक थांबवली पाहिजे या खतांमुळे गहू व तांदूळ यातील पोषणमूल्य कमी झाले आहे. भावी पिढ्यांची अन्नधान्य व जलसुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी नैसर्गिक शेती आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले.

नैसर्गिक व जैविक शेतीमध्ये मोठा फरक आहे असे सांगून रासायनिक तसेच जैविक शेती पेक्षा नैसर्गिक शेती मानव तसेच सूक्ष्म जीव कल्याणाची आहे, असे राज्यपालांनी सांगितले.

धर्म, अर्थ व काम यांच्या माध्यमातून मोक्षप्राप्तीसाठी निरामय आरोग्य आवश्यक आहे व आरोग्यासाठी दिनचर्या, भोजन यांसह पर्यावरण महत्त्वाचे आहे, असे राज्यपालांनी सांगितले. आज जागतिक तापमानवाढीचे जगापुढे मोठे संकट आहे. त्याचा थेट परिणाम शेतीवर पडत आहे. त्यामुळे सर्वांनी नैसर्गिक शेतीला चालना द्यावी व नैसर्गिक उत्पादने खरेदी करावी, असे आवाहन राज्यपालांनी केले.

संकल्प फाउंडेशनचे अध्यक्ष संतोष कुमार तनेजा यांनी आपल्या प्रास्ताविकात संकल्प फाउंडेशनने आजवर हजारो प्रशासकीय अधिकारी घडवले असून ते भारतीय सांस्कृतिक विचार पुढे नेत असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाला रा. स्व. संघाचे मुंबई येथील संघचालक सुरेश भगेरिया, संकल्पचे महासचिव संतोष पाठक, सचिव राजू चौहान तसेच इतर निमंत्रित उपस्थित होते.

## स्वामी रामनंद तीर्थ यांचे मराठवाडा मुक्ती संग्रामात अमूल्य योगदान : मुख्यमंत्री

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ यांनी तरुणाईमध्ये देशभक्ती जागृत केली. तसेच महिला व अनेक स्वातंर्त्यसैनिकांना सोबत घेऊन निजामाच्या जुलमी राजवटीतून मराठवाड्याला मुक्त केले. त्यांचे हे योगदान अमूल्य आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. क्रांती चौक येथील स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पुतळ्याचे, तसेच ऑनलाईन पद्धतीने ऐतिहासिक कमल तलावाचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, खासदार संदिपान भुमरे, राज्यसभेचे खासदार डॉ.भागवत कराड, आमदार संजय केणेकर, आमदार अनुराधा चव्हाण, महापालिका आयुक्त जी. श्रीकांत यांच्यासह मराठवाडा मुक्ती संग्रामात योगदान दिलेल्या स्वातंर्त्यसैनिकांचे कुटुंबिय उपस्थित होते.

स्वामी रामानंद तीर्थ यांचे संपूर्ण जीवन व्रतस्थ होते. स्वामी विवेकानंदांप्रमाणेच तरुणाईमध्ये स्वामी रामानंद तीर्थ यांनी देशभक्ती जागृत केली. भारत स्वतंत्र झाल्यानंतर मराठवाड्याला स्वातंर्त्य मिळण्याकरिता आणखी १३ महिने लागले. रझाकारांनी अन्याय करायला सुरुवात केली होती. या काळात मराठवाडा निजामाच्या इस्टेटचा भाग होता. अखेर रझाकार विरोधात रणसंग्राम सुरू झाला. स्वामी रामानंद तीर्थ यांनी या लढ्यात नेतृत्व करुन हैदराबाद, मराठवाड्यात स्वतंत्र अस्मितेची ज्योत पेटवली. त्यातून अनेक तरुण, महिला या स्वातंर्त्यसंग्रामामध्ये सहभागी झाले. तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी या स्वतंत्र संग्राम सेनानींच्या हाकेला प्रतिसाद देत पोलीस कारवाई केली आणि १७ नोव्हेंबर १९४८ रोजी मराठवाडा मुक्त केला. या स्मृतींना उजाळा देत स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पुतळ्याचे लोकार्पण करत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. त्यांनी स्वामी रामनंद तीर्थ यांच्या पुतळ्याचे शिल्पकार निरंजन मडिलगेकर यांचा याप्रसंगी सत्कार केला.

## महेश बाबू फोनला हात न लावता ८ तास शूटिंग करतो: राजामौली म्हणाले- प्रत्येकाने हे शिकावे, वाराणसीत हनुमानापासून प्रेरित व्यक्तिरेखा

**मुंबई/प्रतिनिधी :** एसएस राजामौली यांच्या आगामी चित्रपट वाराणसी मध्ये सुपरस्टार महेश बाबूच्या मेहनतीची आणि समर्पणाची मोठ्या प्रमाणात चर्चा होत आहे. एसएस राजामौली यांनी विशेषतः सांगितले की महेश बाबू शूटिंग दरम्यान सलग आठ तास काम करतो आणि शूटिंग दरम्यान त्याच्या फोनला हात लावत नाही. चित्रपट उद्योगात त्याची काम करण्याची नीती अनुकरणीय मानली जाते. महेश बाबू अत्यंत व्यावसायिक आहे आणि चित्रपटाच्या प्रत्येक दृश्यात त्याचे सर्वस्व पणाला लावतो. हैदराबादमधील रामोजी फिल्म सिटीमध्ये झालेल्या एका कार्यक्रमादरम्यान एसएस राजामौली यांनी महेश बाबूचे कौतुक केले. ते म्हणाले, ''महेश बाबूच्या व्यक्तिरेखेत काहीतरी खास आहे. ज्यातून प्रत्येकाने शिकले पाहिजे. जेव्हा महेश बाबू ऑफिसला किंवा शूटिंगला येतो तेव्हा तो त्याच्या फोनला हात लावत नाही. तो आठ तास काम करतो आणि घराबाहेर पडतानाच तो त्याचा फोन तपासतो. हा गुण प्रत्येकासाठी धडा आहे.'' या विधानाने सर्वांना आश्चर्यचकित केले आहे. असे म्हटले जात आहे की या आठ तासांच्या शिफ्टला अभिनेत्री दीपिका पदुकोणशी देखील जोडले जात आहे.

''वाराणसी'' चित्रपटातील महेश बाबूचा लूक आणि व्यक्तिरेखा खूपच अनोखी आणि शक्तिशाली असेल. हे पात्र हनुमानापासून प्रेरित असेल असे म्हटले जात आहे. नेहमीप्रमाणे, एसएस राजामौली यांनी या चित्रपटात काहीतरी नवीन आणि मोठे करण्याचा प्रयत्न केला आहे जेणेकरून तो भारतात आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर हिट होऊ शकेल. वाराणसीची कथा आणि ॲक्शन सीक्वेन्सबद्दल प्रेक्षक उत्सुक आहेत. महेश बाबूसोबत प्रियांका चोप्रा आणि पृथ्वीराज सुकुमारन देखील या चित्रपटात काम करत आहेत. हा चित्रपट २०२७ मध्ये प्रदर्शित होण्याची अपेक्षा आहे.

# मायक्रोसॉफ्टच्या नावाखाली अमेरिकन नागरिकांची सायबर फसवणूक, बंगळुरूमध्ये २१ जणांना अटक

बंगळुरू: बंगळुरूमध्ये सायबर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. सीआयडी कार्यालयात नव्यानं स्थापन झालेल्या सायबर कमांड सेंटरनं (सीसीसी) २१ सायबर फसवणूक करणाऱ्यांना अटक केली आहे. हे आरोपी बंगळुरूमध्ये राहणाऱ्या अमेरिकन नागरिकांसह अनेकांना धमकावण्यासाठी आणि फसवणूक करण्यासाठी मायक्रोसॉफ्टच्या नावाचा वापर करत होते. पीएसआय वंदना कलागुरी यांच्या तक्रारीवरून व्हाईटफील्ड सेन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना अटक करण्यात आली आहे. पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितलं की, सायबर गुन्ह्यात आरोपींनी वापरलेले कम्प्युटर, डिजिटल डिव्हाइस, हार्ड डिस्क, लॅपटॉप, मोबाईल फोन आणि इलेक्ट्रॉनिक पुरावे जप्त करण्यात आले आहेत.

बनावट सॉफ्टवेअर कंपनी : मिळालेल्या माहितीनुसार, व्हाईटफील्ड मेन रोडवरील कोडी येथील वर्थुर येथील डेल्टा बिल्डिंगच्या सहाव्या मजल्यावर आरोपींनी मस्क कम्युनिकेशन्स नावाची बनावट सॉफ्टवेअर कंपनी गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये सिग्मा सॉफ्ट टेक पार्क या नावानं सुरू केली होती. तसंच आरोपींनी याठिकाणी कम्प्युटर्स ठेवले होते आणि इतर राज्यांतील लोकांना कामावर ठेवले होतं. विशेष म्हणजे या लोकांना सायबर क्राइमचे ट्रेनिंग देण्यात आलं होतं. हे लोक अमेरिका आणि इतर देशांतील नागरिकांशी ऑनलाइन संपर्क साधत होते. तसंच प्रतिष्ठित कंपन्यांची नावं सांगत होते आणि नागरिकांचे लॅपटॉप हॅक करत होते. तसंच नागरिकांची वैयक्तिक माहिती मिळवत होते. त्यानंतर ते नागरिकांना डिजिटल पद्धतीनं अटक करत होते आणि त्यांच्यावर मनी लाँड्रिंगचे आरोप दाखल करण्याची धमकी देत होते. याशिवाय, पोलीस असल्याचं सांगून नागरिकांना मदतीचं आश्वासन देऊन त्यांची फसवणूक करत होते, असंही पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितलं.



आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल : न्यायालयाकडून सर्च वॉरंट मिळाल्यानंतर पोलिसांच्या एका पथकानं १४ नोव्हेंबर रोजी मस्क कम्युनिकेशन्सवर छापा टाकला आणि हे प्रकरण उघडकीस आणलं. छापा टाकल्यानंतर याठिकाणी काम करणाऱ्या २१ जणांना ताब्यात घेण्यात आलं. त्यांची कसून चौकशी करण्यात आली आणि नंतर त्यांना अटक करण्यात आली. आरोपींविरुद्ध आयटी कायदा २००० च्या कलम ६६, ६६(सी) आणि बीएनएसच्या कलम ३१८(४) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे. तसंच अधिकाऱ्यांनी सांगितलं की इतर फरार आरोपींचा शोध सुरू आहे. दरम्यान, सायबर कमांड सेंटरचे डीजीपी डॉ. प्रणव मोहंती यांच्या मार्गदर्शनाखाली स्पेशल सायबर सेलच्या एसपी सविता श्रीनिवास, एसीपी बालकृष्ण, व्हाइटफील्ड सेन पोलीस स्टेशनचे इन्स्पेक्टर के. सुरेश, कर्मचारी एरम्मा आणि अभिजीत यांच्या नेतृत्वाखालील पथकानं ही कारवाई केली.


## शब्दकोडे क्र. 11

आडवे शब्द

१. निकट, सुमारे ४. शरीरातील वाताचे शमन करणारे उदा.सुंठ, ओवा, हिंग ८. वातावरणशुद्धी करणारा आरतीच्या तबकातील पदार्थ १०. लग्नानंतर सुरुवातीच्या काळात दोघांचाच संसार यांच्यासारखा वाटतो १२. मोठ्या मिनतवारीने घोड्यावर स्वार होणारा १४. श्रीयुत १७. बरोबर १८. रशिया (हिंदी) १९. पृथ्वी २१. डाळीचे कालवण २२. शिजवून बराच काळ झालेला पदार्थ २३. कथन, सांगणे २५. पाऱ्यापासून बनवलेले २६. ही 'वरची' असेल तर बहुदा अवैध २७. घेरी, चक्कर २८. याच्यावरचे श्राद्ध म्हणजे नुसते काम उरकणे! २९. बारीक नक्षीकाम ३०. मदतनीस ३२. तिथे (सं.) ३३. याच्या वाटेवर 'कुचूकुचू काटे' ३५. 'चायनीज' प्रमाणे आजकाल हे भोजनही 'फॅशन' मध्ये! ३६. आरोप ३७. कंटाळवाणी बडबड ३९. जोडीतील एक चर्मवाद्य ४१. धाक ४२. प्रामाणिक ४६. अनिश्चिततेमुळे भीती ४८. सैरभैर ५०. थोर, लोकोत्तर पुरुष ५३. भीती, दरारा ५४. हिंदीत विचार ५५. राकट, रांगडा ५७. खिचडी ५८. हाताला धरून 'पायी पायी' ६०. दरवाजाची झाप ६१. बोटावरील 'आरोग्याचा आरसा' ६३. अभंग रचताना संत तुकारामांनी 'मी तो --- भारवाही' अशी नम्र भूमिका घेतली ६६. चहापाणी इ. ६८. दीपोत्सव ६९. खानेसुमारी ७३. खोडणारे ७४. अडत्या ७५. विधानसभेतील लोकप्रतिनिधी ७६. डोळ्यात तेल घालून सांभाळ ७७. दर्पण ७८. मोठा हातोडा ७९. मोजकेपणा, मितता

उभे शब्द

१. '--- उरी होते ज्यांच्या तेच गीत गाती' (अरूण दाते) २. तेच ते वाचन ३. शिक्षा ४. किराणा व्यापारी ५. युद्धातील घोषणा ६. विपत्तीची कहाणी ७. सार्वजनिक उत्सवात ८. संध्याकाळ ९. फडतूस, भिकार ११. हा 'युवराज' असतोच असे नाही १३. '--- आहे रात्र अजुनी, राजसा निजलास का' १५. अधाशी १६. राजकारणातील यादव, पवार यांचे नाव १७. रक्ताचे नाते असलेला २०. हाळी २३. नोकरी असो की छोकरी ही महत्त्वाची! २४. आकाशातील सत्तावीस तारकासमूह २५. तारतम्य २६. व्यायाम २९. बाळाची निजण्याची जागा ३१. वपुंनी रंगमंचावर लोकप्रिय केलेला प्रयोग ३२. बूड ३३. फणसाची वा आंब्याची पोळी ३४. विद्या ३६. येणे-जाणे (मालाचे) ३८. तळे ४०. शेळी ४२. सरळमार्गी ४३. ताबा, वर्चस्व ४४. झकास ४५. सगळ्यात छोटा साप ४७. दृष्टीभेट ४८. वहीवाट, जाणे-येणे ४९. पुष्ट, जोमदार ५१. चलनवलन ५२. वाजतगाजत ५६. समर्थांच्या व्याख्येनुसार विनोद आवडणारा ५९. इनामी जमीन मिळालेला ६२. कटकारस्थान ६४. बागवान ६५. जीव ६७. पल्याड ६८. आश्वासन ६९. बस्तान ७०. नड ७१. अपेक्षाभंगाने निराश ७२. दया ७४. किंमत ७५. शपथ



### शब्दकोडे क्र. 10 चे उत्तर

आडवे उत्तर

१.हवालदार ६.आतेभाऊ ९.जड १०.रस ११.मामलतदार १५.रन १६.हरकत १८.वग १९.जबडा २१.मनोहर २२.वाकडातिकडा २४.रज २५.मसलत २७.दलाई लामा ३६.नेम ३८.वदन ४०.रामलीला ४२.हर ४४.देहदान ४६.करुण ४७.विनवणी ४९.हर्ष ५०.सहल ५२.आर ५३.वानर ५५.कस ५७.तरतरीत ५९.दारोदार ६०.रामरक्षा ६२.पाल ६३.सदन ६४.मास ६५.तलवार ६७.आज ६८.बारीकसारीक ७१.नट ७२.पर ७३.रंग ७५.पद ७७.चाकरमानी ८०.भरजरी ८१.रचना ८२.लटलट ८३.रज

उभे उत्तर

१.हरहर महादेव २.वासर ३.दामात ४.रम ५.औंदा ७.तेरडा ८.भान ९.जवाहरलाल नेहरू १२.लवकर १३.तगडा १४.रजक १७.कमलकिमान २०.बडा २१.मजला २३.तिन्हीसांज २४.रदबदली २६.तसा २९.नद ३१.डावरा ३३.रोमहर्षक ३५.मला ३७.रमण ३९.दशानन ४१.महाल ४३.पाणी ४४.देह ४५.नस ४६.करतल ४७.विवाहसमारंभ ४८.वरदान ५१.हजरत ५२.आरपार ५४.गोदावरी ५६.सरासरी ५८.तनुज ६१.क्षालन ६४.मासा ६६.वाटचाल ६७.आरमार ६८.बाजरी ६९.कपार ७०.कप ७२.पर ७४.गर ७६.दल ७८.कट ७९.नीज

वृत्तविशेष...

## येणारा काळ आयुर्वेदाचा सुवर्णकाळ : मुख्यमंत्री

**दैनिक आपला विदर्भ**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** आयुर्वेद या निसर्गाशी अनुरुप उपचार पद्धतीचे महत्त्व जगभरात मान्य झाले आहे. आयुष मंत्रालयाने या उपचार पद्धतीला शिक्षण, उपचारात वापर, संशोधन अशा विविध प्रकारे चालना दिली असून येणारा काळ हा आयुर्वेदाचा सुवर्णकाळ असेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. सातार तांडा भागातील श्रीयश आयुर्वेदिक कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल रिसर्च सेंटरच्या नवीन वास्तूचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. इतर मागासवर्ग बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, राज्यसभा सदस्य डॉ. भागवत कराड, श्रीयश प्रतिष्ठानचे बसवराज मंगरुळे, सचिव संगिता मंगरुळे, रुग्णालय अधीक्षक डॉ. परेश देशमुख, अधिष्ठाता स्वाती इटगे आदी मान्यवर उपस्थित होते. भारतीय जीवनपद्धतीस अनुकूल व निसर्गाशी साधर्म्य सांगणारी ही उपचार पद्धती वेदांमध्ये आयुर्वेद या नावाने सांगण्यात आली आहे. आजाराच्या लक्षणांवर नव्हे तर मुळाशी जाऊन आयुर्वेदात उपचार केले जातात. ही उपचार पद्धती शाश्वत उपचार पद्धती आहे. आयुर्वेद उपचार पद्धतीचा जगभरात वापर वाढत आहे. भारतात आयुर्वेद उपचार पद्धतीने उपचार घेण्यासाठी अनेक लोक येत आहेत. आयुर्वेदाने या जगाला विज्ञाननिष्ठ उपचार पद्धती देऊन शल्यचिकित्सा पद्धतीही दिली आहे; असे मुख्यमंत्री म्हणाले.

## अजितदादांना शेजाऱ्याचा धक्का, विश्वासू सहकारी साथ सोडणार, इंदापुरात धमाका

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** इंदापूर नगराध्यक्षपदावरून अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात दोन गट पडले आहेत. पुणे ग्रामीण राष्ट्रवादीचे अध्यक्ष प्रदीप गारटकर यांनी पक्षाकडे नगराध्यक्षपदाची उमेदवारी मागितली होती. परंतु पक्षाने नकार दिल्यानंतर त्यांनी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला आहे. सोमवारी सकाळी ते राष्ट्रवादीच्या सदस्यत्वाचा आणि पुणे ग्रामीण जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा देणार आहे. त्यांच्या निर्णयाने अजित पवार यांना मोठा धक्का बसला आहे. राज्यात नगर पालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. इंदापूर नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवारीसंदर्भात प्रदीप गारटकर प्रचंड आशावादी होते. परंतु राष्ट्रवादी भरतशेठ शहा यांना नगराध्यक्षपदाची उमेदवारी दिल्याने गारटकर यांनी टोकाचा निर्णय घेत पक्षाला सोडचिठ्ठी देण्याचे जाहीर केले आहे. पक्ष जर आम्हाला कोलणार असेल तर आम्हीही पक्षाला कोलू, असे विधान प्रदीप गारटकर यांनी केले होते. आपल्या वक्तव्यानंतर पक्ष संधी देईल, अशी आशा त्यांना होती. मात्र त्यांच्या वक्तव्यानंतरही पक्षाने भरतशेठ शहा यांना उमेदवारी दिल्याने गारटकर यांनी मनगटावरील घड्याळ उतरवण्याचे ठरवले आहे. सोमवारी गारटकर नगराध्यक्षपदासाठी अर्ज दाखल करणार आहेत. पक्ष मला संधी देईल, असे मला वाटत होते. परंतु पक्षाने ज्यांचा प्रवेशही झाला नाही, अशांना संधी देण्याचे ठरवले आहे. कार्यकर्त्यांसाठी लढणाऱ्या व्यक्तीला पक्षाने डावलले आहे. पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा देऊन नगराध्यक्षपदासाठी अर्ज दाखल करणार असल्याचे गारटकर यांनी सांगितले. प्रदीप गारटकर यांची ओळख अजित पवार यांचे अतिशय विश्वासू सहकारी अशी आहे. पुणे ग्रामीणचा भार प्रदीप गारटकर यांच्या खांद्यावर आहे. अजित पवार यांच्या गृह जिल्ह्यातील अनुपस्थितीत गारटकर हे संपूर्ण जबाबदारी सांभाळतात. मात्र तेच राष्ट्रवादीशी फारकत घेत असल्याने अजित पवार यांना निवडणुकीच्या तोंडावर मोठा धक्का बसला आहे.

## बागेश्वरबाबाची पूजा करुन होम हवनच्या नावानं आजीला घातला लाखोंचा गंडा

**दैनिक आपला विदर्भ**

**ठाणे/प्रतिनिधी :** ७० वर्षीय वृद्ध महिलेच्या एकटेपणाचा फायदा घेऊन ७ जणांच्या टोळीनं आपसात संगनमत करून बागेश्वरबाबाची पूजा करून होम हवन केल्यान विघ्न दूर होतील, अशी थाप मारून लाखोंचा गंडा घातल्याची घटना समोर आली आहे. ही घटना उल्हासनगरमध्ये घडली आहे. याप्रकरणी ७ भामट्यांविरोधात विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरु केला आहे. करिष्मा, साहिल, गोली, उषा, उषाचा मुलगा यश, लविना, कशिश आणि गुरुजी अशी गुन्हा दाखल झालेल्या भामट्यांची नावं आहेत. तक्रारदार या उल्हासनगर परिसरातील इमारतीमध्ये एकट्याच राहतात. सर्व आरोपी उल्हासनगर कॉम्प ५ नंबर भागातच राहतात. आरोपी करिष्मानं तक्रारदार आजीच्या एकटेपणाचा फायदा घेऊन त्यांच्याशी ओळख निर्माण केली. त्यानंतर त्यांना रूम घेऊन देण्याच्या नावाखाली त्यांच्याकडून १० लाख रोख घेतले. मात्र, रूम मिळत नसल्यानं तक्रारदार महिलेनं रक्कम परत मागितली असता रक्कम परत करण्यास विघ्न येत असून, त्यासाठी तुम्हाला बागेश्वरबाबाची पूजाअर्चा करून होम हवन करावा लागेल, असं त्यांना सांगून त्यांचा विश्वास संपादन केला, अशी माहिती पोलिसांनी तक्रारीच्या आधारे दिली.आरोपींच्या बोलण्यावर विश्वास ठेवून बागेश्वर भक्त असलेल्या तक्रारदार आजीने घरातील दागिने आणि रोख रक्कम बागेश्वरबाबाची पूजाअर्चा आणि होम हवन करण्यसाठी दिले. दरम्यान, ११ नोव्हेंबरला बागेश्वर बाबाची पूजा आणि होम हवन करत असताना हवनमध्ये दागिने टाकावे लागतील, असं सांगून होम हवन ठिकाणी दागिने ठेवले. त्यानंतर पूजा करून तक्रारदार आजीला बागेश्वर बाबाचा प्रसाद खाण्यास दिला. त्या प्रसादामध्ये गुंगीकारक औषध असल्यानं त्या बेशुद्ध झाल्या. याच संधीचा फायदा घेऊन आरोपींनी त्यांच्या हातातील २० ग्राम सोन्याच्या बांगड्या, हिरं सर्व सामान घेऊन आरोपी फरार झाले, अशी माहिती पोलिसांनी दिली.

# शेवटच्या घटकाचा विचार हाच खरा न्याय – न्यायमूर्ती अनिल किलोर

**दैनिक आपला विदर्भ**

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** संविधानाने आपल्याला मुलभूत अधिकार दिले आहेत. हे अधिकार शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्याची जबाबदारी न्यायिक अधिकाऱ्यांची आहे. नवीन होणारी इमारत सोयीसुविधा युक्त आणि सुसज्ज असली तरी शेवटच्या घटकाचा विचार करून न्यायदान करणे, हेच आपले कर्तव्य आहे, असे विचार मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती अनिल किलोर यांनी व्यक्त केले.

बल्लारपूर येथे दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर) नूतन इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन आणि कोनशिला समारंभात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी मंचावर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती अनिल पानसरे, न्यायमूर्ती महेंद्र नेर्लीकर, चंद्रपूरच्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश समृध्दि भिष्म, बल्लारपूर तालुका बार असोसिएशनचे अध्यक्ष ईनायत सय्यद, बल्लारपूरच्या दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) सोनिया सावळेश्वरकर उपस्थित होते.

### वेळेत आणि गुणवत्तापूर्वक काम करा : न्यायमूर्ती अनिल पानसरे

बल्लारपूर येथे सन २००८ मध्ये फौजदारी आणि दिवाणी न्यायालयाची स्थापना झाली. तेव्हा भाड्याच्या इमारतीमध्ये हे न्यायालय होते. सन २०१० पासून न्यायालयासाठी जागेचा शोध सुरू झाला, आज ती पूर्णत्वास येत आहे. या इमारतीचे बांधकाम २०२७ मध्ये पूर्ण होईल, असे नियोजन आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने वेळेत आणि गुणवत्तापूर्वक काम करावे, अशा सुचना न्यायमूर्ती अनिल पानसरे यांनी दिल्या.

### जलद गतीने न्याय मिळण्यास मदत होईल : न्यायमूर्ती महेंद्र नेर्लीकर

'न्याय आपल्या दारी' या संकल्पनेनुसार प्रत्येक तालुक्यात आणि दुर्गम भागात न्यायालयीन इमारती उभ्या राहत आहे. बल्लारपूरमध्येही उत्तम दर्जाची इमारत उभी होईल. शेवटच्या घटकाला न्याय देऊ, तेव्हाच खरे न्यायदान होईल. या इमारतीमधून वकील आणि न्यायाधीशांच्या सहभागाने जलद गतीने न्याय देण्यास मदत होईल, अशी अपेक्षा न्यायमूर्ती महेंद्र नेर्लीकर यांनी व्यक्त केली.

बल्लारपूर येथील ऐतिहासिक कार्यक्रमाला उपस्थित असणे, हा माझ्यासाठी आनंदाचा क्षण आहे, असे सांगून न्यायमूर्ती किलोर म्हणाले, पैसा नाही म्हणून गरिबाची केस नाकारू नका. अशा लोकांना न्याय मिळवून देणे, ही आपली जबाबदारी आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शेवटच्या घटकाला केंद्रबिंदू मानून न्यायदान करा. 'तारीख पे तारीख' मागणारे वकील आज खुप आहेत. मात्र लवकरात लवकर न्याय देण्यासाठी चांगले वकील आणि न्यायाधीशांची व्यवस्थेला गरज आहे. सर्वसामान्य लोकांचा न्यायव्यवस्थेवर विश्वास आहे, म्हणूनच आपल्याला मान सन्मान मिळतो. हा विश्वास कायम टिकविण्यासाठी सर्वांनी सामूहिक प्रयत्न करावे.

पुढे न्यायमूर्ती किलोर म्हणाले, न्यायालयाची अतिशय चांगली इमारत बल्लारपूर येथे उभी राहणार आहे. महाराष्ट्रात तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या न्यायालयाच्या इमारतीमध्ये बल्लारपूर हे सर्वोत्कृष्ट राहील. चित्रफिती मध्ये दाखवल्याप्रमाणेच इमारत व्हायला पाहिजे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागावर जास्त जबाबदारी आहे. न्यायालयाच्या इमारतीकरिता शासनाने जमीन आणि पैसा उपलब्ध करून दिला. भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी राज्यातील न्यायालयीन इमारतींना सोयीसुविधा युक्त आणि सुसज्ज करण्याचा चंग बांधला. त्याचीच ही फलश्रुती आहे. न्यायमूर्ती गवई यांच्या प्रयत्नातून अतिशय चांगल्या पायाभूत सुविधा उपलब्ध होत आहे, असेही न्यायमूर्ती अनिल किलोर यांनी सांगितले.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती भिष्म म्हणाल्या, न्यायालयाची ऐतिहासिक वास्तू बल्लारपूर मध्ये उभी राहत आहे. बल्लारपूरला सांस्कृतिक आणि सामाजिक वारसा आहे. न्यायालयाच्या इमारतीची कमतरता होती ती आज पूर्ण होत आहे. प्रास्ताविकात ईनायत सय्यद म्हणाले, आजचा हा दिवस सुवर्ण अक्षरात लिहून ठेवावा, असा आहे. हे केवळ भूमिपूजन नाही तर न्यायाच्या मंदिराची पायाभरणी आहे.

कार्यक्रमाचे संचालन दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) नेहा गोरले आणि रमा कपील यांनी तर आभार दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) सोनिया सावळेश्वरकर यांनी मानले.

अशी राहील न्यायालयाची इमारत : ३६ कोटी ७३ लक्ष रुपये खर्च करून बांधण्यात येणारी ही इमारत तळमजला अधिक तीन मजले अशी साकारण्यात येणार आहे. तळमजल्यावर साक्षदार केंद्र, समुपदेशन कक्ष, लोक अदालत कक्ष, चौकीदार कक्ष. पहिल्या माळ्यावर २ कोर्ट हॉल, २ न्यायाधीश कक्ष, प्रशासकीय कामाकरीता कार्यालयीन कक्ष. दुसऱ्या माळ्यावर दोन कोर्ट हॉल, दोन न्यायाधीश कक्ष, दोन अधिवक्ता कक्ष, ग्रंथालय, मध्यस्थी कक्ष, सहायक सरकारी अभियोक्ता कक्ष आणि तिसऱ्या माळ्यावर व्ही.सी. रूम, सभा कक्ष, न्यायाधीश ग्रंथालय, अभिलेखागार कक्ष राहणार आहे.

## संगमनेरमध्ये निवडणूक आयोगाने जप्त केलेली एक कोटींची रोकड कोणाची? समोर आली मोठी अपडेट

**संगमनेर/प्रतिनिधी :** संगमनेर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहराच्या प्रवेशद्वारावर आढळलेल्या एक कोटींच्या रोकड प्रकरणाचा मोठा खुलासा झाला आहे. खांडगाव फाटा येथे शनिवारी दुपारी निवडणूक आयोगाच्या सर्वेक्षण पथकाने एका कारमधून तब्बल १ कोटींची रक्कम जप्त केली होती. या घटनेमुळे परिसरात राजकीय खळबळ माजली होती.

राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची धामधूम सुरू आहे. नगर परिषद आणि नगर पंचायतीच्या निवडणुकीचा धुरळा उडाला असून काही ठिकाणी प्रचारही सुरू झाला आहे. तर काही ठिकाणी आघाडी–युतीच्या चर्चा सुरू आहेत. निवडणुकांमध्ये आचारसंहितेचे उल्लंघन होऊ नये यासाठी निवडणूक आयोगाकडून दक्षता घेतली जात आहे. अशातच निवडणूक आयोगाच्या पथकाने एक कोटींची रोकड ताब्यात घेतल्याने चर्चांना उधाण आले होते. मागील काही महिन्यात संगमनेरचं राजकीय वातावरण तापलं असताना दुसरीकडे ऐन निवडणुकीच्या धामधुमीत रोख रक्कम सापडल्याने मोठी खळबळ उडाली.

निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झालेले असताना एवढी मोठी रक्कम जप्त झाल्याने शहरात चर्चांना ऊत आला होता. या पाठीमागे राजकीय हेतू असण्याची शक्यता, पैसे नेमके कुठे वापरले जाणार होते, आणि याचा निवडणुकीशी काही संबंध आहे का, या सर्व प्रश्नांवरून वादंग निर्माण झाले.

## संतोष बांगरांच्या वहिनीविरोधात ठाकरेंच्या नेत्याच्या बहिणीला तिकीट, हिंगोलीत काँटे की टक्कर

**दैनिक आपला विदर्भ**

**हिंगोली/प्रतिनिधी :** हिंगोली नगरपरिषद निवडणुकीसाठी महाविकास आघाडीतील तिन्ही पक्ष एकत्र आले असून नगरपरिषदेची निवडणूक एकत्रित लढवणार आहेत. हिंगोली नगराध्यक्षपदासाठी ठाकरे शिवसेनेच्या अर्चना श्रीराम भिसे यांच्या उमेदवारीची घोषणा करण्यात आली आहे. आज महाविकास आघाडीतील तिन्ही घटक पक्षांच्या नेत्यांनी एकत्र येत संयुक्त पत्रकार परिषदेत नाव जाहीर केले आहे. उद्या महाविकास आघाडीचा उमेदवार शक्तीप्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे.

आगामी निवडणुकीच्या निमित्ताने हिंगोलीतील राजकारण तापले आहे. आमदार संतोष बांगर आणि भाऊराव पाटील गोरेगावकर यांच्या उपस्थितीत हिंगोली नगराध्यक्षपदासह नगरसेवक पदांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. शिंदेसेनेकडून रेखा बांगर यांनी नगराध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला. रेखा बांगर यांच्याविरोधात ठाकरे सेनेच्या अर्चना श्रीराम भिसे लढणार आहेत.

हिंगोली नगरपरिषदेत महायुती होण्याची शक्यता मावळत चालली आहे. कारण शिवसेनेचे आमदार संतोष बांगर यांनी स्वबळाचा नारा देत त्यांच्या वहिणी रेखाताई श्रीराम बांगर यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तर काल भारतीय जनता पक्षाने त्यांच्या उमेदवार नीता बाबाराव बांगर यांचा उमेदवारी दाखल केला आहे. या पार्श्वभूमीवर आता महाविकास आघाडीतील तिन्ही घटक पक्षांनी एकत्र येत अर्चना श्रीराम भिसे यांची उमेदवारी जाहीर केली आहे.

अर्चना श्रीराम भिसे या उबाठा शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख तथा सहसंपर्कप्रमुख विनायक भिसे यांच्या भगिनी आहेत. हिंगोलीत विनायक भिसे आणि संतोष बांगर मागील अनेक वर्षांपासून कट्टर राजकीय विरोधक आहेत. ठाकरे गटाने भिसे यांच्या भगिनीला तिकीट देऊन हिंगोलीची सढत अधिकच रंगतदार केली आहे. तसेच महाविकास आघाडीने नगर परिषदेसाठी कंबर कसल्याचे चित्र आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादीचा स्वबळाचा नारा, प्रफुल्ल पटेलांनी सांगितली पक्षाची योजना

**दैनिक आपला विदर्भ**

**भंडारा/प्रतिनिधी :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुतीमधील पक्ष एकत्र दिसण्याची शक्यता जवळपास संपू लागली आहे. राज्याच्या वेगवेगळ्या भागांमधील स्थानिक नेत्यांनी स्वबळाचा नारा दिल्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने भंडारा व गोंदिया या दोन जिल्ह्यांमध्ये स्वबळाचा नारा दिला आहे. या दोन्ही जिल्ह्यांमधील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्वतंत्रपणे उभा राहणार आहे.

प्रफुल्ल पटेल यांनी काही वेळापूर्वी भंडारा येथे प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, ''स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुतीने स्वबळावर लढण्याचा विचार केला आहे. काही काही ठिकाणीच आणि आम्हाला जमल्यास महायुतीमधील पक्षांची युती होऊ शकते. परंतु, महायूतीच्या तिन्ही पक्षांनी निर्णय घेतला आहे. कारण सगळ्या पक्षांमध्ये कार्यकर्ते खूप उत्सुक असतात. नऊ वर्षानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागल्या आहेत. स्वाभाविक आहे की इच्छुकांची खूप मोठी गर्दी असते. सर्वांना न्याय देण्यासाठी सर्वांनी तसा निर्णय घेतला आहे.



''भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातील निवडणुका आम्ही स्वबळावरच लढत आहोत''

प्रफुल्ल पटेल म्हणाले, ''तिन्ही पक्ष एकत्र लढल्यास आम्ही कार्यकर्त्यांना न्याय देऊ शकणार नाही. तसेच स्थानिक स्तरावर काही वेगवेगळी परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे तिथला निर्णय तिथेच घ्यावा लागेल. भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातील निवडणुका आम्ही स्वबळावरच लढत आहोत. एखाद्या ठिकाणी कुठे तडजोड करायचा प्रसंग आल्यास आम्ही तशी तडजोड करू.

''निवडणूक लढविण्यासाठी पैसा महत्त्वाचा असला तरी केवळ पैशाने निवडणूक जिंकता येत नाही, त्यामुळे कोणीही स्वत:ला बाहुबली समजू नये'', असा सूचक इशारा प्रफुल्ल पटेल यांनी यावेळी दिला. त्यांनी हे वक्तव्य करताना कोणाचेही नाव घेतलेले नसले तरी त्यांचा थेट भाजपाला इशारा असल्याचे बोलले जात आहे.

# प्लेक्स कॉन्सिलच्या ७० वर्षाच्या कार्याचा गौरव

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** प्लास्टिक निर्यात क्षेत्रात भारताची प्रगती घडवणाऱ्या प्लेक्सकॉन्सीलचा सत्तरावा वर्धापन दिन आणि निर्यात उत्कृष्टता पुरस्कार समारंभाला आज वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी मुंबई येथे उपस्थिती दर्शविली. या प्रसंगी परिषदेनं भारताच्या प्लास्टिक निर्यात उद्योगाची ७० वर्षांची सेवा पूर्ण केल्याचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला. २०२३–२४ आणि २०२४–२५ या कालावधीत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या निर्यातदारांना गोयल यांनी एकूण १४८ निर्यात उत्कृष्टता पुरस्कार प्रदान केले.

आपल्या भाषणात गोयल यांनी प्लास्टिक उद्योगाला देशाच्या शाश्वतता ध्येयांनुसार आणि पुनर्वापरयोग्य व पर्यावरणपूरक उत्पादनांच्या वाढत्या जागतिक मागणीच्या पार्श्वभूमीवर १००म पुनर्वापर आणि पुनर्चक्रीकरणाच्या दिशेने निर्णायक पाऊल उचलण्याचे आवाहन केले. भारताकडे शाश्वत प्लास्टिक उत्पादनात जागतिक नेता बनण्यासाठी आवश्यक क्षमता आणि कौशल्य असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. यासाठी प्रगत तंत्रज्ञान, नवकल्पनात्मक साहित्य आणि जबाबदार उत्पादन पद्धतींमध्ये गुंतवणूक करून भारताच्या हरित आणि शाश्वत भविष्याप्रति बांधिलकी उद्योगाने अधिक दृढपणे प्रदर्शित करावी, असे त्यांनी सांगितले.

''प्लास्टिक उद्योगाने मोठी उद्दिष्टे ठेवायला हवीत. पुढील पाच वर्षात देशांतर्गत बाजारपेठ १०० अब्ज अमेरिकी डॉलर्स आणि निर्यात उत्पन्न २५ अब्ज अमेरिकी डॉलर इतके साध्य करण्यासाठी उद्योग क्षेत्राने प्रयत्न करावेत. गुणवत्ता, शाश्वतता, तंत्रज्ञान आणि जागतिक स्तरावरील अधिक सहभाग यांच्या साहाय्याने भारताचा प्लास्टिक उद्योग ही उद्दिष्टे गाठू शकेल आणि गाठणारच,'' असे पीयूष गोयल म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली, विशेषत: मुक्त व्यापार कराराद्वारे आणि प्रमुख जागतिक भागीदारांसमवेत सुरू असलेल्या वाटाघाटींच्या माध्यमातून सरकारने निर्माण केलेल्या अभूतपूर्व बाजारपेठ संधींवर मंत्र्यांनी प्रकाश टाकला. मुक्त व्यापार करारांमुळे, भारतीय निर्यातदारांना नवीन संधी खुल्या होत असून ब्रिटन, ईएफटीए, अमेरिका, युरोप, ओमान, बहारीन आणि न्यूझीलंड सारख्या राष्ट्रांमध्ये सुधारित बाजारपेठ प्रवेश, व्यापारातील अडथळ्यांमध्ये घट आणि स्पर्धात्मकतेमध्ये वृद्धी प्रदान होत असल्याचे त्यांनी नमूद केले. या बाजारपेठांमध्ये सक्रीय विस्तार करणे आणि जागतिक मूल्य साखळीमध्ये भारताच्या समरसतेला बळकटी मिळण्यासाठी त्यांनी निर्यातदारांना प्रोत्साहित केले.

गुणवत्ता, विश्वासार्हता आणि स्पर्धात्मक उत्पादक क्षमता यांमुळे भारताकडे वाढत्या प्रमाणात, एक विश्वासार्ह आणि विसंबून राहाण्यायोग्य जागतिक सामग्री केंद्र म्हणून पाहिले जात आहे असल्याचे सांगून, त्यांनी उद्योगांना उत्पादन निर्मितीत विविधता आणून आणि भारताच्या विस्तारणाऱ्या मुक्त व्यापार कराराच्या जाळ्यामुळे उदयास येणाऱ्या नव्या व्यापार संधींचा फायदा घेऊन ही गती कायम राखण्याचा आग्रह केला.



भारताच्या निर्यातीत, प्रगतीत, रोजगार निर्मिती आणि 'मेड इन इंडिया' ब्रँडवरील जागतिक विश्वासात योगदान देणारा, प्रत्येक पुरस्कारविजेता हा लवचिकता, नवोन्मेष आणि उत्कृष्टतेची कथा सादर करत असल्याचे निरीक्षण गोयल यांनी नोंदवले. जागतिक पुरवठा साखळीला चालना देणाऱ्या मोठ्या उत्पादकांपासून ते नवोन्मेषाला चालना सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांपर्यंत, सर्व पुरस्कारविजेते भारताच्या प्लास्टिक क्षेत्राची ताकद आणि विविधता प्रतिबिंबित करतात. ब्रँड इंडिया हा विश्वास, गुणवत्ता आणि विश्वासार्हतेचे प्रतीक आहे आणि जागतिक मूल्य साखळीत भारताचे स्थान उंचावत असतानाही, गुणवत्तेशी तडतोड होता कामा नये, यावर त्यांनी भर दिला.

या प्रसंगी बोलताना, प्लेक्सकॉन्सिलचे अध्यक्ष विक्रम भदौरिया यांनी मंत्र्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली आणि सर्व पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले. त्यांनी प्लेक्सकॉन्सिलच्या ७० वर्षांच्या प्रवासात २००+बाजारपेठांमध्ये जागतिक अस्तित्व निर्माण करणाऱ्या भारतीय निर्यातदारांचा अग्रणी हेतू प्रतिबिंबित होत असल्याचे त्यांनी नमूद केले.